# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0241 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**03/06/2026 22:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिंनाक पासून):** 03/06/2026
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 03/06/2026
**Time From (वेळेपासून):** 15:31 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:08 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 03/06/2026 **Time (वेळ):** 22:24 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 035
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 03/06/2026 22:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** शासकीय धान्य गोदामाच्या आवारा,धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): यशवंत बोरसे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, धुळे,धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, धुळे,धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9527427065

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मनिष महेश बागुल | | | 1. ए/903, ओमकार पार्क,, दिंडोरी रोड, नाशिक ,धुळे शहर, धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रु दराच्या 10 चलनी ना◌ोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

धुळे शहर पोलीस स्टेशन, गु.र.नं. 241/2026 भ्र.प्र.का. सन 1988 चे कलम 7 प्रमाणे
मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 39 वर्षे,पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे
समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे एक वर्षापासुन कार्यरत आहे. दि.03.06.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार एकनाथ रामजी पाटील यांनी आमचे कक्षात समक्ष हजर राहुन त्यांचेकडे पुरवठा निरीक्षक तथा गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल हे लाचेची मागणी करीत असल्याचे सांगितल्याने आम्ही मा.उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील दोन शासकिय कर्मचारी श्री.रविंद्र शिवनाथ कवाडे, भूकरमापक व श्री.रविंद्र निंबा नंदन, भुकरमापक यांना उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे अशी ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार एकनाथ रामजी पाटील व सापळा पथकाची ओळख करुन दिली.
त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव एकनाथ रामजी पाटील, वय 53 वर्षे, व्यवसाय शेती, रा.मु.पो.अंचाडे ता.जि.,धुळे असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली. त्यानंतर त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची तक्रार टंकलिखीत करुन घेण्यात आली ती पुढील प्रमाणे '' माझे नावे मौजे अंचाडे येथे शेत गट नं.135/1/क, 135/1/अ, 142/2, 136/2 व माझी पत्नी सौ.भिकुबाई एकनाथ पाटील यांचे नावे गट नं. 142/1 व 135/2/ब अशी शेतजमीन आहे. महाराष्ट्र शासनाच्या किमान आधारभुत भरड धान्य खरेदी हंगाम रब्बी सन 2025-26 अंतर्गत आमचे शेतातील पिकविलेली ज्वारी शासनाकडून खरेदी होण्यासाठी आम्ही दि. 14.04.2026 रोजी ऑनलाईन नोंदणी केली होती.
मला शासनाकडून ज्वारी खरेदी करण्यासाठी ज्वारी धुळे येथील शासकीय गोदाम येथे येणेबाबत मोबाईल वर मॅसेज न आल्याने मी दोन ते तीन दिवसापुर्वी त्याबाबत चौकशी करण्याकरीता धुळे शासकीय गोदाम येथे गेलो असता तेथे हजर असलेल्या कर्मचाऱ्याने यादी पाहुन मला माझे व माझे पत्नीच्या नावे ऑनलाईन नोंदणी केल्याप्रमाणे आज दि. 03.06.2026 रोजी ज्वारी शासनातर्फे खरेदी करण्याकरीता धुळे शासकीय गोदाम येथे ज्वारी घेवुन येण्यास सांगितले होते.
त्याप्रमाणे मी आज दि.03.06.2026 रोजी माझे व माझे पत्नीचे नावे ऑनलाईन नोंदणी केलेली ज्वारी शासनातर्फे खरेदी होण्यासाठी धुळे शासकीय गोदाम येथे घेवुन आलो तेव्हा शासनाने नेमलेल्या कृषि उत्पन्न बाजार समिती/जिल्हा मार्केटींग अधिकारी यांचे अधिपत्याखाली आमचे ज्वारीचे मोजमाप होवुन मला व माझे पत्नीस ज्वारी मोजमापाच्या पावत्या दिल्या. तेव्हा तेथे हजर असलेले गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांनी मला बाजुला बोलावुन घेवुन '' तुमची ज्वारी चांगल्या दर्जाची दाखवुन मी मोजणी करुन घेण्यास सांगितले आहे त्याचे मला 5,000/- रुपये दयावे लागतील अन्यथा तुमचे ऑनलाईन बिल टाकण्यास सांगणार नाही'' असे सांगितले आहे.
माझी ज्वारी चांगल्या दर्जाची असुन मला गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांना त्यांच्या मागणी प्रमाणे 5,000/- रुपये लाच देण्याची अजिबात इच्छा नाही. परंतु मी त्यांना पैसे दिले नाही तर ते माझे ज्वारीचे ऑनलाईन बिल टाकण्याच्या प्रक्रियेस विलंब करतील माझा गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांचे सोबत कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वाद विवाद नाही.
मी आज दि.03.06.2026 रोजी धुळे शासकीय गोदाम येथे गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांना भेटण्यास जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपल्या विभागामाफत कायदेशीर कारवाई करावी ही विंनती आहे.''
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही

पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या.
त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांची धुळे शासकीय गोदाम येथे भेट घेण्यासाठी तक्रारदार यांची दुचाकी क्रमांक एम. एच.18 डी.क्यु 5215 ने तक्रारदार एकनाथ पाटील व पंच नं. 01 रविंद्र कवाडे यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच कवाडे असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 कवाडे यांना विचारणा केली असता त्यांनी ते व तक्रारदार यांनी धुळे शासकीय गोदामात जावुन गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांची भेट घेतली असता बागुल साहेबांनी तक्रारदार यांना सव्वाशे क्विंटल ग्रेड वन मध्ये टाकली असल्याचे सांगुन तक्रारदार यांना त्यांचे उजव्या हाताचे पाच बोटे दाखवुन पेमेंट अशी विचारणा केली.तेव्हा तक्रारदार यांनी जास्त होतात सर असे सांगितले. तेव्हा बागुल साहेबांनी अस करु नका तुम्हाला पाच हजार सांगितले होते ना असे सांगितले तेव्हा त्यांचेत तडजोड होवुन बागुल साहेबांनी 5,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य करुन तक्रारदार यांना पैसे लवकर घेवुन येण्यास सांगितल्याची हकीगत कथन केली. सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांनी तक्रारदार यांच्याकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची खात्री झाली. त्यानंतर आम्ही सापळा आयोजित करण्याचा निणय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी 500/- रुपये दराच्या 10 नोटा, असे 5,000/- रुपये हजर केले. त्यानंतर सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पायजमाच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 कवाडे अशांना तक्रारदार यांच्या दुचाकीने धुळे शासकीय गोदामात गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 रविंद्र नंदन, पोहेकॉ.राजन कदम, चापोहेकॉ. सुधीर मोरे यांचेसह शासकिय वाहन क्रमांक एम.एच.18 एफ 170 ने व पोकॉ. मकरंद पाटील, पोकॉ.रामदास बारेला, पोकॉ.प्रविण पाटील, पोका. सागर शिर्के असे दुचाकीं वाहनांने रवाना होवुन धुळे शासकीय गोदामा जवळ जावुन परिसरात आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी डोळ्यावरील चष्मा काढुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा पंच नं. 01 कवाडे यांनी सांगितल्याप्रमाणे गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाच स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या मागील खिशात ठेवुन घेतलेली 5,000/- रुपये लाचेची रक्कम आमचे सुचनेवरुन पंच नं. 02 रविंद्र नंदन यांनी ताब्यात घेतली. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पोकॉ/रामदास बारेला व पोकॉ/सागर शिर्के यांनी गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांना ताब्यात घेतले. त्यानंतर ला.प्र.वि, धुळे कार्यालयात येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्र शासनाच्या किमान आधारभुत भरड धान्य खरेदी हंगाम रब्बी सन 2025-26 अंतर्गत शासनाकडून खरेदी करण्याकरीता मनिष महेश बागुल, पुरवठा निरीक्षक तथा गोदाम व्यवस्थापक मनिष महेश बागुल यांनी तक्रारदार एकनाथ रामजी पाटील व त्यांच्या पत्नीचा ज्वारीचा माल चांगला दर्जाचा दाखवुन मोजणी करुन घेण्यास सांगितल्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांच्याकडे आज दि.03.06.2026 रोजी पंचांसमक्ष 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर सदर लाचेची रक्कम आज रोजी 17.08 वाजता सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडून स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिंयाद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

dipak dagadu patil(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** dipak dagadu patil
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पोलीस ठाणे अंमलदार
धुळे शहर पोलीस स्टेशन

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**